बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि १७ मे २०२४**

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २९८/२०२४ भादवि ३८०,४५४,४५७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १३/०५/२०२४ रोजी १९.०० वा. ते दि १४/०५/२०२४ रोजी १०.०० वा चे सुमारास फिर्यादीच्र राहते घरी ११३,पिड्डा नगर जुना विडी घरकुल सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १६/०५/२०२४ रोजी २३.०७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | राकेश दत्तात्रय ताटीपामुल,वय-३३ वर्षे,रा-११३,पिड्डा नगर जुना विडी घरकुल सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १,२०,०००/- रू त्यात भारतीय चलनी नोटा |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादीच्या बंद घराचा दरवाज्याला लावलेले कडी कोयडा हा कोणीतरी अज्ञात चोरटयाने तोडून घरात प्रवेश करून घरातील बेडरूममधील लोखंडी कपाट तोडून त्यामधील रोख रक्कम ही फिर्यादीच्या संमतीशिवाय मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून. तपास:- सपोनि सोळुंखे- **९५५२२८५९००** |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २९९/२०२४ भादवि ४०६,४२०,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०६/०२/२०२३ ते दि १४/०५/२०२४ रोजी १०.०० वा चे सुमारास ई १०३ रो हाऊस खतीब नगर अ.कोट रोड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १६/०५/२०२४ रोजी २३.३२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अंजुम सद्दाम हुसेन शेख,वय-२४ वर्षे,रा- ई १०३ रो हाऊस खतीब नगर अ.कोट रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १.जाफर मौला नदाफ २) शहेनाज जाफर नदाफ रा-पटेल बिल्डींग संगमेश्वर नगर अ.कोट रोड सोलापूर |
| **फसवणुक र** | : | १ लाख ७० हजार रूपये |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि ०६/०२/२०२३ ते १४/०५/२०२४ रोजी १०.०० वा च्या दरम्यान फिर्यादी राहत असलेल्या घरजागेचे मालक यातील आरोपीत मजकूर यांनी फिर्यादीकडून घरजागा भाडेपोटी १ लाख ७० हजार रूपये विश्वासाने घेवून घरावर असलेले श्रीराम फायनान्सचे थकीत कर्जाबाबतची माहिती लपवून वांरवार फिर्यादीशी खोटे बोलून भाडे करार पत्राचा भंग करून फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे.म्हणून. तपास:- सपोनि चंदनशिवे- **९६२३३१४१२७** |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २७२/२०२४ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,१४३,१४७,१४८ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १५/०५/२०२४ रोजी २१.३० वा. मसरेवस्ती आंबेडकर उदयान जवळ न्यु बुधवार पेठ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १६/०५/२०२४ राजी ०४.१९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अभिजीत आनंद वाघमारे,वय-३२ वर्षे,रा- ०७,मसरे वस्ती आंबेडकर उदयान जवळ न्यु बुधवार पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १.मनोहर सावंत २) विजय सावंत ३) गट्टु सावंत ४) सिध्दार्थ सावंत ५) सोनाली सावंत ६) सोनू सावंत ७) हर्षवर्धन सावंत, सर्व रा- मसरेवस्ती आंबेडकर उदयानजवळ सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी,यातील आरोपीत मजकूर हे फिर्यादीचे आईस आमच्या घरासमोर कचरा का टाकता या कारणावरून शिवीगाळ व हाताने मारहाण करीत असताना यातील फिर्यादी हा मध्ये येऊन माझ्या आईस का मारहाण करता असे विचारले असता यातील आरोपी क्र १ यांने वीट घेवून फिर्यादीच्या तोंडावर मारली तर आरोपी क्र ३ यांने लाकडी वाशाने व अरोपी क्र २ यांने वीटाने दगडाने मारहाण करून शिवीगाळी व दमदाटी करून फिर्यादीचा मित्र सिध्देश्वर सोनवणे यास हाताने व लाथाबुकयाने मारहाण केली म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ८३६/भोगशेट्टी- ८८८८२३३९३३ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २७४/२०२४ भादवि ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १५/०५/२०२४ रोजी २१.३० वा. फिर्यादीच्या बहिणीच्या घरी रामराज्य नगर शेळगी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १६/०५/२०२४ रोजी १३.५३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विनोद गुंडाप्पा बिराजदार,वय-३१ वर्षे,रा- सलगर ता.अक्कलकोट जि.सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | शांतकुमार होळगी व त्यांचे दोन भाऊ रा- रामराज्य नगर शेळगी सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी हे बाहेरून फिर्यादीची बहिण हिच्या घरी रामराज्य नगर शेळगी येथे आले त्यावेळी बहिणीच्या घराशेजारी राहणारा यातील आरोपी हा त्यांच्या घरासमोर थांबलेला दिसला म्हणून फिर्यादी तेथे जावून त्याना दोन महिन्यापुर्वी तुमच्या मुलाने माझ्या बहिणीला मारहाण केली बायकावर हात उचलने बरोबर आहे का तुमच्या घरातील बायकांनवर कोणी हात उचलला तर तुम्हाला कसे वाटेल असे समजावून सांगत असताना यातील आरोपीने फिर्यादीस तु आमच्या बायकाबद्दल बोलतो का असे म्हणून शिवीगाळी करू लागला त्यावेळी फिर्यादीच आई रत्नाबाई ही तेथे येवून फिर्यादीस घरात घेवून जात असताना यातील आरोपीत मजकूर यांनी घरातून फायबरचे पाईप हातात घेवून आले |

| | | |
|---|---|---|
| | | व त्यांने फिर्यादीस मारहाण करीत असताना फिर्यादीची आई मध्ये आले असता तिला देखील शिवीगाळ करून त्यांच्या हातातील पाईपने मारहाण करून जखमी केले आहे. म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १४५४/गायकवाड- |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३०९/२०२४ भादवि ३०२,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १६/०५/२०२४ रोजी १६.३० वा चे सुमारास तोडकरवस्ती बाळे पुणे रोड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०५/२०२४ रोजी ०३.५२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अलका रघुनाथ गायकवाड,वय-५५ वर्षे,रा- तोडकरवस्ती बाळे पुणे रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) नागेश ज्ञानेश्वर कोळेकर,रा- तोडकर वस्ती बाळे,२) आशितोष ऊर्फ आवी राजू गाडेकर रा- मेंगाणे नगर बाळे सोलापूर |
| **मयताचे नाव** | | लखन रघुनाथ गायकवाड,वय-२३ वर्षे,रा- तोडकरवस्ती बाळे पुणे रोड सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादीचा मुलगा यातील मयत यास दारू पिण्याचे व्यसन असल्याने तो सतत दारू पित असत दिनांक १६/०५/२०२४ रोजी १६.३० वा दारूच्या नशेत घरी येऊन फिर्यादीस दारू पिण्यासाठी पैसे दे असे म्हणत होता तेव्हा फिर्यादीचे माझ्याकडे पैसे नाहीत असे सांगत असताना त्याने फिर्यादीस शिवीगाळ करीत होता.त्यावेळी फिर्यादीच्या ओळखीचे आरोपी क्र १ यांचे गाडीवर यातील मयत हा क्लिनर म्हणून काम करत होता त्यामुळे वरील आरोपीताची फिर्यादीबरोबर ओळख होती सदर वेळी वरील आरोपीतांनी यातील मयत लखन यास आईस शिवीगाळ का करत आहे तुला सांगितलेले कळत नाही काय असे म्हणून शिवीगाळ करून दोघांनी लाकडी दांडका व प्लॅस्टिकच्या पाईपने लखनच्या अंगावर,हातावर,पायावर,छातीवर मारहाण करीत असताना फिर्यादीने आरोपीतांना मारहाण करू नका असे सांगत असताना त्या दोघांनी फिर्यादीचे काही ऐक न ऐकता फिर्यादीच्या मुलास यातील मयत लखन यास माराहण करून जखमी करून जीवे ठार मारले आहे म्हणून. तपासः- सपोनि बारावकर-९४०३३९६३४२ |